# महाराष्ट्र विधानसभा

**दिवसाच्या कामकाजाचा क्रम**
**मंगळवार, दिनांक २१ मार्च, २०२३**
**(सकाळी ०९.१५ ते १०.४५ वाजेपर्यंत)**

**(अ) : अर्धा-तास चर्चा (म.वि.स. नियम ९४ अन्वये) :-**

**(मंगळवार, दिनांक १४ मार्च, २०२३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या तथापि चर्चा न झालेल्या अर्धा-तास चर्चेच्या सूचना) (क्रमांक १ व २)**

**(१) श्री. रईस शेख, वि.स.स.**

"भिवंडी (जि.ठाणे) तालुक्यातील वक्फ बोर्डाच्या जमिनीवर अतिक्रमण केल्याबाबत" या विषयावरील श्री.रईस शेख व इतर वि.स.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक ५१३४८ ला दिनांक २७ डिसेंबर, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील.

**(२) श्री. प्रकाश आबिटकर, वि.स.स.**

"राज्यातील छोटया शहरात आयटी केंद्र उभारण्याबाबत" या विषयावरील श्री.मोहनराव हंबर्डे, वि.स.स. यांचा दिनांक २६ डिसेंबर, २०२२ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तराची यादी क्रमांक १२३ मधील प्रश्न क्रमांक ४३००५ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील.

**(ब) लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :**

**(१) श्री. पृथ्वीराज चव्हाण, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"सन २०१४ मध्ये कोकण व पश्चिम महाराष्ट्रास जोडणारा चिपळूण-कराड रेल्वे मार्ग होण्यास मान्यता देण्यात येणे, प्रकल्पाचा अर्धा खर्च राज्य सरकार करण्याचा निर्णय घेण्यात येणे, दिनांक १४ ऑगस्ट, २०१६ रोजी तत्कालीन रेल्वेमंत्री सुरेश प्रभु यांनी

अप्रकाशित प्रत

भूमीपुजन करणे, कोकण रेल्वे व शापुर्जी पालनजी कंपनी प्रायव्हेट लिमिटेड (एसपीसीपीएल) यांच्यादरम्यान हा सामंजस्य करार झालेला असणे, मात्र अद्याप प्रत्यक्षात काम सुरु न होणे, या सोबतच केंद्रीय रेल्वे अर्थसंकल्पामध्ये निधीची तरतूद न केल्याचे दिसून येणे, परिणामी कोकण व पश्चिम महाराष्ट्रातील जनतेची घोर निराशा होणे, राज्याकडून या महत्वकांक्षी रेल्वे मार्गाकरिता राज्याच्या अर्थसंकल्पामधून निधीची तरतूद होण्याची आवश्यकता असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(२) **ॲड. आशिष शेलार, ॲड. पराग अळवणी, कॅप्टन आर. तमिल सेल्वन, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"मुंबई महानगरपालिकेकडून दिनांक १ मे, २०२२ रोजी मुंबईत सर्वांसाठी पाणी या धोरणाची घोषणा करण्यात येणे, मुंबईकरांना २४ तास पाणी देण्याचे स्वप्न महानगरपालिका दाखवित असतानाच आजही सुमारे १३ ते १४ लाख नागरिक कायदेशीर पाण्यापासून वंचित असल्याचे धक्कादायक वास्तव उघड होणे, मुंबईतील नागरिकांना अनौपचारिक पाणी मिळविण्यासाठी महिन्याला हजारो रुपये खर्च करावे लागत असल्याची बाब निदर्शनास येणे, आपण जे शुद्ध पाणी वापरतो ते आपला मळ—कचरा घेऊन सरळ निघून समुद्रात सोडले जात असणे, या वापरलेल्या पाण्यावर प्रक्रिया करून या पाण्याचा पुर्नवापर करणे ही संकल्पना केवळ कागदावरच राहिली असणे, काही खाजगी संस्थांनी हा प्रयोग करून पुर्नवापरासाठी पाणी दिले असले तरी महानगरपालिकेकडे व्यवस्था नसल्याचे कोरडे उत्तर महापालिका प्रशासनाकडून दिले जात असल्याची धक्कादायक बाब समोर येणे, पाणी वितरण व्यवस्थेत दररोज ३० टक्के बेहिशेबी पाणी वाया जात असून हे पाणी हॉटेल, निवासी आणि खाजगी क्रीडा संकुलांना अवैध जोडण्या देऊन वितरीत केले जात असल्याची बाब निदर्शनास येणे, मुंबईच्या भौगोलिक हद्दीत केवळ ३ टक्के पाणी स्त्रोत असून मुंबईला ९७ टक्के पाणी मुंबई बाहेरून आणावे लागत असणे, मुंबईतील पाण्याचे स्त्रोत विकासाच्या नावाखाली नष्ट झाल्या असून हे स्त्रोत बुजवून जमीन विकसित करताना, कॉंक्रिटीकरण करताना भूगर्भातील पाण्याचे स्त्रोत नाहीसे झाले असणे, मुंबईतील पाणी चोरी रोखण्यासाठी नियमित वॉटर ऑडीट करण्याची आवश्यकता, त्याचप्रमाणे मुंबईतील पाणी समस्या लक्षात घेता मुंबईतील पाण्याचे संवर्धन करण्यासाठी मुंबईतील दहिसर, पोयसर आणि ओशिवरा या नद्यांसह, नैसर्गिक पाण्याचे स्त्रोतांचे पुनरुजीवन करण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

अग्रिम प्रत

**(३) श्री. संजय सावकारे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"जळगाव जिल्ह्यातील भुसावळ येथे मध्य रेल्वेच्या भुसावळ विभागाचे प्रशासकीय मुख्यालय असून भुसावळ रेल्वे जंक्शन हे भारतातील एक महत्वाचे जंक्शन असणे, त्यामुळे या शहरात रेल्वे विभागातील कर्मचारी मोठ्या प्रमाणात असणे, तसेच भुसावळ शहरालगतच्या परिसरामध्ये वरणगाव ऑर्डनन्स फॅक्टरी, दिपनगर पावर जनरेशन, रेल्वेचे रेल्वे झोनल ट्रेनिंग स्कुल, लष्करी तळ असणे, तसेच एम.आय.डी.सी. भुसावळ मध्ये कार्यरत असलेले कर्मचारी भुसावळ शहरात स्थायिक असणे, त्यामुळे भुसावळ शहरात एकंदरीत कर्मचारी वर्ग मोठ्या प्रमाणात असणे, त्यानुषंगाने भुसावळ शहराची लोकसंख्या व कर्मचारी संख्या विचारात घेता त्यांच्यासाठी सोईसुविधा पुरविण्याच्या अनुषंगाने भुसावळ शहराची हद्दवाढ होणे अत्यंत गरजेचे झाले असणे, हद्दवाढ होत नसल्याने सर्वसामान्य जनतेस आवश्यक सार्वजनिक सोईसुविधा पासून वंचित रहावे लागत असून त्याचा ताण भुसावळ शहरावर पडत असणे, भुसावळ ही जळगाव जिल्ह्यातील सर्वात मोठी 'अ' वर्ग नगरपरीषद असून, नगरपरिषदेची स्थापना सन १८८२ रोजी बॉम्बे म्युनिसिपल ॲक्ट १८८२ अन्वये झाली असणे, हद्दवाढीच्या प्रस्तावामध्ये भुसावळ, सतारे, कंडारी, साकेगाव, खडके, मिरगव्हाण, खेडी या शिवारांचा भागशः क्षेत्रांचा समावेश केला असून, त्यामध्ये हद्दवाढीचे ६.९४ चौ. कि.मी. क्षेत्र मिळून अंदाजे २०.३२ चौ. कि.मी. क्षेत्र नगरपरिषदेच्या सुधारीत हद्दीकरीता प्रस्तावित करण्यात येणे, भुसावळ शहराची लोकसंख्या सन २०११ च्या जनगणनेनुसार १,८७,७५० इतकी असणे, या प्रस्तावित लोकसंख्येस मुलभूत सुविधा जसे पाणी पुरवठा, रस्ते, गटारी, सांडपाणी व्यवस्था, घनकचरा व्यवस्थापन इ. सुविधांपासून वंचित राहावे लागत असल्याने नागरीकांचा रोष वाढत असणे, परीणामी त्याचा ताण नगरपरिषदेवर पडत असणे, नागरीकांना आरक्षणाच्या माध्यमातून बगीचा, दवाखाने, शाळा, कालेज, प्ले ग्राऊंड इ. सुविधा देण्याच्या दृष्टीकोनातून तसेच शहराचा सुनियोजित विकास होण्याच्या दृष्टीकोनातून हद्दवाढ तातडीने होणे गरजेचे असणे, त्याबाबतचे प्रस्ताव नगरपालिकेने नगरविकास विभागाला पाठविले असणे, परंतु अद्याप त्यावर कोणताच निर्णय न घेणे, त्यामुळे भुसावळ नगरपरिषदेच्या हद्दवाढीबाबत शासनाने घ्यावयाची निर्णय व करावयाची कार्यवाही."

**(४) सर्वश्री. नानाभाऊ पटोले, विजय वडेट्टीवार, सुनिल केदार, अस्लम शेख, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"नवी मुंबई तळोजा येथे मे. डावू केमिकल इंटरनॅशनल प्रायव्हेट लिमिटेड या उद्योगाने लॅटेक्स पॉलिमर केक अशास्त्रीय पद्धतीने विल्हेवाट करीत असल्याचे माहे फेब्रुवारी, २०२३ च्या दरम्यान निदर्शनास येणे, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडून

मे. डावू केमिकल इंटरनॅशनल प्रायव्हेट लिमिटेड, तळोजा यांना पर्यावरणाची हानी केल्याबाबत रु.२२०.५५ कोटी रुपयांचा दंड ठोठावला असणे, परंतू अद्याप दंड वसूलीला होत असलेली दिरंगाई, परिणामी स्थानकांमध्ये पसरलेली तीव्र असंतोषाची भावना, याबाबत राज्य शासनाने चौकशी करुन पर्यावरणाची हानी झाल्याने दंडाची रक्कम वसूल करणेबाबत करावयाची कार्यवाही व याकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबंधितांवर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”

**(५) डॉ. किरण लहामटे, सर्वश्री. अजित पवार, जयंत पाटील, छगन भुजबळ, दिलीप वळसे-पाटील, धनंजय मुंडे, अनिल पाटील, कुमारी आदिती तटकरे, सर्वश्री. चेतन तुपे, विनोद निकोले, धर्मरावबाबा आत्राम, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आदिवासी विकास मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

“राज्यातील विविध शासकीय, अशासकीय आणि अनुदानित आणि विनाअनुदानित शैक्षणिक संस्थांमध्ये दरवर्षी विविध व्यावसायिक आणि अव्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश दिले जाणे, व्यावसायिक अभ्यासक्रम जसे बीएस्सी अग्री, बी ई, एम बी बी एस इत्यादी साठी प्रवेश देत असतांना जात वैधता प्रमाणपत्र याची मागणी केली जाणे आणि नंतरच प्रवेश दिले जाणे, मात्र अव्यावसायिक अभ्यासक्रम जसे एम एस्सी, एम कॉम, एल एल एम, इत्यादी साठी प्रवेश देत असतांना मात्र जात वैधता प्रमाणपत्र मागितले जात नसणे किंवा विचारात घेतले जात नसणे, फक्त जात प्रमाणपत्राच्या आधारे प्रवेश दिला जात असल्याने बोगस उमेदवार यांनी प्रवेश घेऊन खऱ्या अनुसूचित जमातीच्या उमेदवार यांच्यावर अन्याय होणे, यामुळे खरे अनुसूचित जमातीच्या विध्यार्थी उच्च शिक्षणापासून वंचित राहण्याची शक्यता असणे, राज्यात विविध आदिवासी संघटना यांच्याकडून अव्यावसायिक अभ्यासक्रमात प्रवेश देतांना जात पडताळणी प्रमाणपत्र अनिवार्य करावे अशी मागणी वेळोवेळी होणे, फक्त जात प्रमाणपत्रा आधारे बोगस आदिवासी उमेदवार यांनी जागा बळकावणे ही बाब गंभीर आणि चिंतनीय असून याबाबत त्वरेने कार्यवाही करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”

**(६) प्रा. डॉ. अशोक उईके, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आदिवासी मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

“भारताला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्ष झाली परंतु आजही आदिवासी समाजातील आदिम जनजाती (कातकरी) समाज हा सोयी सुविधांपासून वंचित राहिला असणे, तसेच शासन स्तरावर या समाजाला मुख्य प्रवाहात आणण्या करिता अनेक योजना राबविल्या जाणे, परंतु सदारच्या योजना या फक्त कागदावरच राहतात प्रत्यक्षात आदिम कातकरी

समाजाला त्याचा कोणताही लाभ मिळत नसल्याचे दिसून येणे, तसेच, हुतात्मा नाग्या कातकरी यांच्या स्मृतीदिनानिमित्ता संबधित समाजाने दिनांक १२ जानेवारी, २०२१ वा त्या सुमारास शासनाकडे निवेदनामार्फत मागणी करणे, म्हणजेच आदिम कातकरी समाजाला त्यांच्या घरासाठी त्या त्या गावातील गायरान हक्काची जागा मिळावी तसेच प्रत्येकाला पंतप्रधान आवास योजना किंवा शबरी आवास योजना घरकुल मिळावे, तसेच ज्या धरणात मच्छीमारी करतात त्याच धरणाचा ठेका या आदिम कातकरी समाजाला कमी रकमेत मिळावा, शेळीपालन, कुक्कुट पालन, वीट भट्टी अशा स्वरुपाच्या योजनांची प्रभावी अमंलबजावणी करावी, त्याबरोबरच आरोग्याच्या मोठ्या प्रमाणावर समस्या आहेत त्यामुळे त्यांना आयुष्यमान भारत अंतर्गत आरोग्य योजनेचे कार्ड काढून मिळावे, आणि आदिम कातकरी समाज हा शिक्षणापासून वंचित असून त्यांना साक्षर करण्यासाठी त्या त्या वस्तीत बालवाडी चालू कराव्यात, तसेच बऱ्याच महिला विधवा, अपंग, परीतक्त्या आहेत त्यांना देखील कागदपत्रे नसल्यामुळे याचा लाभ घेता येत नाही, तरी त्यांना याचा लाभ मिळावा आणि या समाजाला सर्व प्रकारची कागदपत्रे मिळावी उदा. आधारकार्ड, रेशनकार्ड, मतदानकार्ड, जातीचा दाखला तसेच अनेकांचे जन्माचे दाखले व विवाह नोंदीचे दाखले नोंदणी करून मिळावेत, तसेच दारिद्र्य रेषेखालील रेशनकार्ड मिळावे जेणेकरून त्यांना दारिद्रय रेषेखालील सरकारी योजनेचा लाभ घेता येईल याबाबत जनजाती कल्याण आश्रम नाशिक संचलित पुणे जिल्हा यांनी व विविध संघटनांनी आदिवासी समाजाचा हक्कासाठी वेळोवेळी शासनास पत्रव्यवहार करणे व शासनाने कोणतीही दखल न घेणे, व या समाजाचे सर्वेक्षण अद्याप न होणे, तसेच मा.आदिवासी विभाग मंत्रालयाने यासंदर्भात अद्याप एकही आढावा बैठक न घेणे, त्यानंतर संबंधित संघटनेने राष्ट्रीय जनजाती आयोग नवी दिल्ली यांना तक्रार करणे, आणि त्यानंतर पुणे जिल्ह्यात मुळशी हवेली प्रांत यांनी दखल घेणे, त्यानंतर दिनांक ३०/११/२०२२ ला आदिवासी कातकरी सामाजाचा जातीचा दाखला, आधार कार्ड आदी संदर्भात कॅम्प घेण्यात येणे, मात्र अद्याप एका व्यक्तीला सुद्धा जातीचे दाखले न मिळणे, तसेच मुळशी खडकवासला हवेली प्रांत श्री.संजय आसवले आणि मुळशी तहसिलदार श्री.अभय चव्हाण यांच्याकडे संबंधित समाजाचे लोक दाखल्याबाबत विचारणा केल्यावर उडवाउडवीची उत्तरे देणे आणि दिवस दिवसभर कार्यालयात बसवून ठेवणे, अर्वाच्य भाषेत संवाद साधणे, याबाबत वेळोवेळी शासनास तक्रार करूनही अधिकाऱ्यांवर कोणतीही कार्यवाही न होणे, तसेच याबाबत पुणे, सिंधुदुर्ग, नाशिक, नंदुरबार, पालघर या जिल्ह्यात प्रामुख्याने अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष होत आहे असे प्रखरतेने आढळून येणे, यामुळे आदिम जनजाती (कातकरी) समाज हा शासनाच्या सोयी सुविधांपासून अद्याप वंचित राहिलेला असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”

**(७) श्री. संजय गायकवाड, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सार्वजनिक आरोग्य व कुटूंब कल्याण मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

“जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालय बुलडाणा येथे एन.एल. हेल्थ केअर सोलापुर या संस्थेला सन २०२२-२३ मॉडेयुलर ओटी व लेबर रुमचा २३ कोटी रुपयांचा पुरवठा आदेश देण्यात आलेला असणे, जिल्हा शल्य चिकीत्सक यांनी कुठल्याही प्रकारे निवीदेद्वारे खरेदी न करता ८०% आगाऊ रकम देणे, कंत्राटदार सोबत संगनमत करुन शासनाची करोडो रुपयांची केलेली तफावत, निकृष्ट साहित्य देणे, खोटे बिल सादर करणे, कोवीड काळात निष्काळजीपणा करणे, ही बाब लक्षात घेता दिनांक २६/२/२०२३ ला कंत्राटदार यांना सक्तीची नोटीस बजावणे, कंत्राटदार व जिल्हा शल्य चिकीत्सक यांनी मोठ्या प्रमाणामध्ये बिले काढणे, पुन्हा या वर्षाचा सन २०२३ चा कंत्राट त्यांनाच देणे, याबाबत तातडीने मागील वर्षाची चौकशी करून या वर्षाचा कार्यारंभ आदेश रद्द करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”

**(८) श्री. संतोष दानवे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे कृषी मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"राज्यातील जालना जिल्हयासह भोकरदन व जाफराबाद तालुक्यासह संपूर्ण राज्यामध्ये ज्या शेतकऱ्यांनी पीकविमा भरलेला नसेल अशा शेतकऱ्यांच्या नावावर पीकविमा भरण्याच्या शेवटच्या तारखेपूर्वी संबंधित शेतकऱ्यांच्या खोट्या सह्या करून बनावट भाडेपट्टा तयार करीत शेतकऱ्यांच्या नावावर येणारी पिकविम्याची रक्कम स्वतःच्या बँक खात्यावर वळती करून शेतकरी बांधवांना लाखों रुपयांचा गंडा घालणारी टोळी (रॅकेट) उघडकीस येणे, शेतकऱ्यांच्या हक्काचे पीकविमा अनुदान विमा कंपन्यांच्या अधिकाऱ्यांशी व गावोगावी सक्रिय झालेल्या दलालांशी संगनमत करून लाखों रुपयांचा भ्रष्टाचार करणारी टोळी राज्यात काम करीत असून संबंधित टोळीचा पर्दापाश करून शेतकऱ्यांचे होणारे लाखों रुपयांचे नुकसान टाळण्यासाठी शासनामार्फत कारवाई करण्याची आवश्यकता, सदर टोळीची चौकशी करून संबंधित आरोपींवर कठोर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी विभागातील जनप्रतिनिधी, जागरूक नागरिक यांनी मा.कृषी मंत्री, पीकविमा समितीचे जिल्हाध्यक्ष, जिल्हाधिकारी, जिल्हा अधीक्षक, कृषी अधिकारी यांच्याकडे माहे फेब्रुवारी, २०२३ वा त्यासुमारास केली असणे, परंतु याकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, यामुळे नागरिकांमध्ये शासनाप्रती पसरलेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

अप्रकाशित प्रत

**(९) सर्वश्री. राजन साळवी, भास्कर जाधव, वैभव नाईक, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे इतर मागास बहुजन कल्याण मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"स्वातंत्र्यानंतर अनेकवेळा तिल्लोरी कुणबी या समाजाच्या सर्वेक्षणासाठी अनेक वेळा अभ्यास समिती नेमण्यात येणे, त्यानुसार सन १९९६ च्या राज्य अध्यादेशात ओबीसी यादिमध्ये ८३-तिल्लोरी कुणबी समाजाचा समावेश करण्यात येणे, असे असतांनाही घटणाबाह्य हिंदू-कुणबीचे पुराव्यांची मागणी जिल्हा प्रशासनाकडून मनमानी पध्दतीने करण्यात येणे, त्यामुळे समाजाचे मिळणारे आरक्षण आज संकटात सापडलेले असणे, माहे जानेवारी, २०२३ पासून रत्नागिरी जिह्यातील तिल्लोरी कुणबी उल्लेख असलेल्या कुणबी समाजाला दाखले देणे जिल्हा प्रशासनाने पूर्णपणे बंद करणे, सध्या राज्यात दहावी, बारावीच्या परिक्षा सुरु असणे, परिक्षेनंतर उत्त्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना पुढे प्रवेश घेण्यासाठी जातीचे दाखले आवश्यक असतांना मात्र रत्नागिरी जिल्ह्यातील तिल्लोरी कुणबी समाजाच्या विद्यार्थ्यांना दाखले देणे बंद केल्यामुळे या समाजातील विद्यार्थ्यांना पुढे प्रवेश मिळण्यास अडचण निर्माण होणार असणे, परिणामी त्यांचे शैक्षणिक नुकसान होणार असणे, तसेच जिल्ह्यात पुढील कालावधीत ग्रामपंचायत निवडणूकांमध्ये उमेद्वार, सदस्यांचे दाखले, पंचायत समिती, जिल्हा परिषद निवडणुका लागणार असणे, त्यासाठी उमेद्वारांना आवश्यक जातीचे दाखले लागणार असणे, परंतू जिल्ह्यात तिल्लोरी कुणबी समाजाच्या नागरीकांना दाखलेच देणे बंद केल्यामुळे या समाजातील नागरीकांना निवडणूकीच्या वेळी उमेद्वारी मिळण्यासाठी मोठी समस्या निर्माण होणे, कुणबी समाज हा ओबीसी वर्गात येत असणे, तसा शासनाचा शासन निर्णयही असणे, त्यामुळे जिल्हा प्रशासनाकडून दाखले देणे बंद करण्यात आल्याने कुणबी समाजातील नागरीकांमध्ये वाढलेला तीव्र असंतोष, शासनाने यासंदर्भात तात्काळ चौकशी करुन रत्नागिरी जिल्ह्यातील जिल्हा प्रशासनाने बंद केलेले ओबीसी प्रवर्गातील ८३-तिल्लोरी कुणबी समाजातील नागरिक, विद्यार्थ्यांना जातीचे दाखले पुर्ववत सुरु करण्याच्या अनुषंगाने निर्णयात्मक कार्यवाही करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

अग्रिम प्रत

## ( सकाळी ११.०० वाजता )

**एक : प्रश्नोत्तरे.**

**दोन : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे -**

**(१) मुख्यमंत्री** : मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(२) खनिकर्म मंत्री** : जिल्हा खनिज प्रतिष्ठान, पुणे, नांदेड, जळगांव, नंदुरबार, जालना, पालघर, गडचिरोली, हिंगोली, परभणी, वाशिम, औरंगाबाद या जिल्ह्यांचे सन २०१६-२०१७ ते २०२१-२०२२ व जिल्हा खनिज प्रतिष्ठान, नागपूर यांचे सन २०१६-२०१७ ते २०२०-२०२१ या वर्षांचे वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(३) कामगार मंत्री** : महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ यांचे सन २०१४-२०१५ ते २०२०-२०२१ या वर्षांचे वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**तीन : लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :**

**(१) श्री. चंद्रकांत निंबा पाटील, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे महसूल मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"बोदवड तालुक्यातील (जि. जळगांव) जलचक्र खुर्द येथील २८/२ मध्ये मे.महालक्ष्मी स्टोन क्रशर धारकाने सन २०१७ ते माहे डिसेंबर, २०१९ दरम्यान सदरील जमिनतून लाखो ब्रास उत्खन्नत करुन अवैध विक्री करणे, वास्तविक पाहता जलचक्र खुर्द येथील २८/२ ही वर्ग २ ची जमिन असून शेती प्रयोजनार्थ वापर करणे बंधनकारक असतांना त्या जमिनीचा वाणिज्य वापर करण्यात येणे, तसेच सदरील प्रकरणी नेमलेल्या चौकशी समितीने चौकशी करुन केवळ ४२९४.२१ ब्रासच्या उत्खन्नांवर दंड आकरण्यात

असुधारित प्रत

येऊन संबंधित क्रशर धारकांला पाठीशी घालण्याचा प्रयत्न करणे, त्याचबरोबर स्टोनक्रशर धारकांवर गौण खनिज चोरी प्रकरणी दंडात्मक कारवाई अपेक्षित असतांना प्रांत व बोदवड तहसिलदार यांची फक्त स्वामित्वधन फरकाची रक्कम वसूल करणे, प्रशासनातील अधिकारी सदर क्रशर अधिकाऱ्याला पाठीशी घालण्याचा प्रयत्न करुन शासनाच्या करोडोचा महसूल बुडवित असल्याप्रकरणी संबधित अधिकाऱ्यांवर कडक कारवाई करुन संबधित क्रशर धारकांकडून दंडाची रक्कम वसूल करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.''

(२) **सर्वश्री. अमीन पटेल, अस्लम शेख, सुनिल केदार, ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे), श्री. विजय वडेट्टीवार, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे वैद्यकीय शिक्षण मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"मुंबईसह महाराष्ट्रातील सर्व शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात व रुग्णालयातील निवासी वैद्यकीय अधिकारी (आर.एम.ओ) मागील अंदाजे १२ ते १५ वर्षापासून अस्थायी म्हणुन काम करीत असणे, दिनांक ३० एप्रिल, २०२१ पर्यंत निवासी वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या सेवेला सलग दोन वर्षे झालेली असणे, या निवासी वैद्यकीय अधिकाऱ्यांनी कोविड काळात देखील आपल्या जीवाची पर्वा न करता फ्रंटलाईन वर्क केलेले असणे, त्यांच्या सरळ सेवेमधील समावेशाचा प्रस्ताव सचिव कार्यालय, वैद्यकीय शिक्षण विभाग येथे प्रलंबित असणे, महाराष्ट्रातील लातूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील निवासी वैद्यकीय अधिकाऱ्यांनी मॅट कोर्ट, छत्रपती संभाजीनगर येथे सदरील विषयावर अपील केलेले असणे, दिनांक १८ ऑगस्ट, २०२२ रोजी मॅट कोर्टाने सदरील वैद्यकीय अधिकाऱ्यांना शासन सेवेत समाविष्ट करुन घेण्याचे आदेश दिलेले असणे, सचिव कार्यालयातील प्रलंबित प्रस्तावामध्ये ज्या वैद्यकीय अधिकाऱ्यांनी शासन सेवेमध्ये दोन वर्षापेक्षा अधिक कार्यकाळ काम केलेले असणे, अशा वैद्यकीय अधिकाऱ्यांचा सरळ वैद्यकीय सेवेत समावेश करण्यात यावे असे नमूद असणे, वैद्यकीय शिक्षण विभागामध्ये या पूर्वीही ज्या सहाय्यक प्राध्यापक डॉक्टरांनी २ वर्षांपेक्षा अधिक काम केलेले आहे त्यांचे सलग चार वेळा समावेश केले आहे, निवासी वैद्यकीय अधिकाऱ्यांचे आजमितीपर्यंत एकदाही समावेश करण्यात आलेला नसणे, महाराष्ट्रातील सर्व वैद्यकीय महाविद्यालये व रुग्णालयातील निवासी वैद्यकीय अधिकाऱ्यांचे मॅट कोर्ट, छत्रपती संभाजीनगर यांच्या निर्णयानुसार समावेश करण्यात यावे अशी निवासी वैद्यकीय अधिकारी यांची मागणी असणे, परंतू अद्यापही या निवासी वैद्यकीय अधिकाऱ्यांचा सरळसेवेत समावेश करण्याबाबत शासन आवश्यक कार्यवाही करीत नसल्याने त्यांच्यामध्ये निर्माण झालेली असुरक्षिततेची भावना लक्षात घेता याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(३) श्री. जयकुमार गोरे, ॲड. राहूल कुल, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"मायणी, ता. खटाव, जि. सातारा येथील रूरल इन्स्टिटयूट ऑफ रिसर्च सेंटर व हॉस्पिटल, मायणी या मेडिकल कॉलेजच्या प्रवेशासाठी मोठ्या प्रमाणावर बोगस कागदपत्रे तयार केली असल्याची धक्कादायक बाब उघडकीस आली असणे, सदर मेडिकल ॲडमिशन होत असताना संस्था चालकांनी बारावी पासचे सर्टिफिकेट, मायग्रेशन सर्टिफिकेट, तसेच शाळेचे दाखले बोगस तयार करून विद्यार्थ्यांना वैद्यकीय शिक्षणासाठी प्रवेश देऊन प्रक्रिया राबविली असणे, विद्यार्थ्यांना कमी मार्क असताना मेरिटमध्ये येण्यासाठी सर्व बोगस कागदपत्रे तयार करून ती शासनास सादर करून मायणी येतील रूरल इन्स्टिटयूट ऑफ रिसर्च सेंटर हॉस्पिटल येथे ॲडमिशन प्रक्रिया केली असून तेथे बोगस डॉक्टर तयार केले असे निदर्शनास आले असणे, यामध्ये तत्कलीन संस्था चालकांनी संगणमताने हे कृत्य केले असल्याचे निदर्शनास आले असणे, यासंदर्भात दिनांक १८ मे, २०२१ रोजी मा. पोलीस अधीक्षक सातारा यांच्याकडे तक्रार दाखल केली असून त्यासंदर्भात अद्याप कोणतीही चौकशी केली नसणे, गुन्हा दाखल झालेला असताना तपास अधिकारी यांनी सूत्रधारकांना अभय दिलेला असणे, यामुळे पात्र विद्यार्थ्यांना प्रवेशास मुकावे लागल्यामुळे विद्यार्थ्यांच्या मनात मोठा असंतोष पसरलेला असणे, असेच जाळे महाराट्र मध्ये अनेक ठिकाणी चालू असणे, यामुळे पात्र विद्यार्थ्यांच्या मनात पसरलेला असंतोष, याबाबत शासनाने तातडीने लक्ष घालून गुन्हेगारावर कार्यवाहीची आवश्यकता व उपाययोजना."

**(४) श्रीमती सरोज आहिरे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"नाशिक येथील एकलहरे औष्णिक वीज निर्मिती केंद्रात विद्युत विनियमासंदर्भात सोयी सुविधा उपलब्ध असणे, त्यामध्ये ६५० एकर जागा रेल्वेमार्ग, प्रशासकीय इमारती, कामगार वसाहत, राख साठवणूक बंधारा, पाणी इत्यादी आवश्यक त्या सोयीसुविधांचा समावेश असणे, राज्यातील अव्वल वीजनिर्मिती केंद्रापैकी एकलहरे हा विद्युत प्रकल्प असणे, तसेच शासनाने एकलहरे येथे ६६० मेगावॅट प्रकल्प यापुर्वीच मंजूर केलेला असणे, तथापि शासकीय अधिकाऱ्यांच्या नाकर्तेपणामुळे हा मंजूर झालेला प्रकल्प रखडलेला असणे, वास्तविक सदर औष्णिक विद्युत प्रकल्प बंद करण्याचा शासनाने निर्णय घेतलेला नसणे, असे तत्कालीन मा. ऊर्जा मंत्री यांचेकडून माहे जानेवारी, २०२२ मध्ये सांगण्यात येणे, एकलहरे येथील नवीन प्रकल्प सुरु झाल्यास हजारो कामगार व व्यवसायिकांना रोजीरोटी व व्यवसाय उपलब्ध होणार असल्याचे निदर्शनास येणे, तेथील मा. स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी सदरचा मंजूर झालेला नवीन प्रकल्प तातडीने सुरु करण्याबाबत आग्रही मागणी करण्यात येणे, तथापि आजतागायत शासनाने प्रकल्प सुरु

करण्याबाबत कोणतीही कार्यवाही केलेली नसणे, परिणामी त्या परिसरातील तरुणवर्गामध्ये तसेच व्यवसायिकांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे वातावरण, शासनाने याप्रकरणी तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया.”

**(५) श्री. भिमराव तापकीर, ॲड. राहूल कुल, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

“पुणे जिल्ह्यातील खडकवासला धरणाच्या पाणलोटक्षेत्रात अतिक्रमणे वाढत असणे, अतिक्रमणांचे पुनर्सवेक्षण होण्याची आवश्यकता, पाटबंधारे विभागाकडे अतिक्रमणांची अद्ययावत माहिती उपलब्ध नसणे, जलसंपदा विभागाने धरणाच्या पाणलोटक्षेत्राबाहेरील पाटबंधारे विभागाच्या जमिनीची मोजणी करण्यासाठी भूमी अभिलेख विभागाकडे कोट्यावधी रुपयांचे चलने भरून तसा वारंवार पाठपुरावा करून देखील मोजणी प्रक्रिया सुरु झालेली नसणे, मोजणीस होत असलेल्या विलंबामुळे धरणक्षेत्रातील जमिनींवरील अतिक्रमणांना पाठबळ मिळत असणे, जमिनीच्या मोजणीस होत असलेल्या विलंबामुळे धरणाच्या पाणलोटक्षेत्रात जलसंपदा विभागाची नेमकी कोठे व किती जमीन आहे याची माहिती मिळत नसल्याने जलसंपदा विभागाच्या बहुतांश जमिनीवर, ओढ्या-नाल्यावर खाजगी व्यावसायिक स्वरुपाची अतिक्रमणे झाल्याचे निदर्शनास येत असणे, आजमितीस बहुतांश पूररेषा आणि पाणलोटक्षेत्रात अतिक्रमणे, बांधकामे झाली असणे, तसेच खडकवासला धरणाचे जलप्रदुषणात देखील वाढ झाली असून धरण व पाणलोटक्षेत्र व परिसरात कंपन्या, रेस्टॉरंट, रिसोर्ट व इतर व्यावसायिक स्वरूपाच्या बांधकामांमध्ये पूर्ण क्षमतेने सिवेज ट्रिटमेंट प्लांट व तद्नुषंगिक आवश्यक असणाऱ्या उपाययोजना न केल्याने राजरोसपणे सांडपाणी आणि कचरा व राडारोडा मिसळला जात असणे, धरणाचे जलप्रदूषण नियंत्रणात आणण्यासाठी सांडपाणी समस्या आणि घनकचरा व्यवस्थापन करिता कृती आराखडा करण्यात आला नसल्याने जलप्रदूषणाचा स्तर वाढत असल्याने आरोग्यास धोका निर्माण होणे, दुषित पाण्यामुळे त्यावर अवलंबून असलेले नागरिक व वनस्पती आणि प्राणी-पक्षी यांच्या जीवितास धोका निर्माण होणे, धरणाच्या व धरणाकडे येणाऱ्या पर्यटकांच्या सुरक्षेचा प्रश्न अतिशय गंभीर झाला असणे, धरणाची हद्द संरक्षित नसल्यामुळे जलप्रवाह आणि पाणलोटक्षेत्रात व कॅनॉल मध्ये बुडून अनेकांचा बळी गेला असणे, खडकवासला धरण हे सुरक्षित नसून धरणाच्या सुरक्षेकडे दुर्लक्ष करत जलसंपदा विभाग पुणेकरांच्या जीवाशी खेळत असणे, सीसीटीव्ही, सुरक्षारक्षक, माहिती फलक, संरक्षण जाळी, संरक्षण भिंतीसारख्या प्राथमिक गरजा देखील पूर्ण करण्यात आल्या नसल्याचे निदर्शनास येत असणे, जलसंपदा विभागाचा लोकप्रतिनिधी यांच्याशी समन्वय नसणे याकडे जलसंपदा विभागाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.”

**(६) श्री. दादाराव केचे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"आर्वी विधानसभा मतदार संघातील मौजा थार, चामला, बांबर्डा, बोरखेडी, बोटोणा, पारडी, एकांबा, किन्ही मोई, मुबारकपुर ही गावे पहाडी व डोंगराळ भागात बसलेली असणे, त्या ठिकाणी पर्जन्यमान हे अत्यंत कमी असणे, त्यामुळे या भागात दरवर्षी पिण्याच्या पाण्याची व शेतीकरिता सिंचनाचा अत्यंत तुटवडा जाणवत असणे, सदर गावे ही दुष्काळग्रस्त असून त्या गावातील जनतेचा उदरनिर्वाह हा शेतीचे उत्पन्नावर अवलंबून असणे, तसेच गावातील शेतकरी शेतीसोबत जोड व्यवसाय म्हणून पशुपालन करणे, परंतु पाण्याच्या तुटवट्यामुळे त्यांना जनावरांचे स्थलांतर बाहेर गावी करावे लागणे, त्यामुळे शेतकऱ्यांना आर्थिक परिस्थितीचा सुध्दा सामना करावा लागणे, बारमाही पाणी साठवणुकीकरिता कुठलीही व्यवस्था नसल्यामुळे दरवर्षी पाण्याचा दुष्काळ पडत असणे, त्या गावात जानेवारी महिण्यानंतर पिण्याकरिता पाणी उपलब्ध राहत नसणे, करिता या भागातील शेतक-यांना पिण्याचे पाणी व सिंचनाची सोय होण्याच्या दृष्टीने जाम नदीवर नवनिर्मीत मध्यम सिंचन प्रकल्प मंजुर करण्याकरीता जनतेचे मागणी तात्काळ मंजुर करून देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**(७) ॲड. अशोक पवार, सर्वश्री. दिलीप मोहिते-पाटील, चेतन तुपे, संजय जगताप, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"पुणे जिल्हयातील शिरुर व खेड तालुक्याला वरदान ठरलेल्या चासकमान डावा कालवा १४४ किलोमिटर अंतराचा असून कालव्यामध्ये झाडेझुडपे व कॅनोल अस्तरीकरणाच्या अभावी आवर्तनाच्या वेळी लाखो लिटर पाणी वाया जाणे, चासकमान कॅनोलमध्ये दगड माती पडून कॅनोलची रुंदी व खोली कमी होणे तसेच झाडाझुडपांनी अनेकांच्या पोटचाऱ्या गाडून टाकणे, सदरचा कालवा हा रोजगार हमी योजनेतून झाला असल्याने प्रकल्पाची अपूर्ण कामे पूर्ण होणे गरजेचा असणे, कॅनोलमधील पाणी गळतीचे प्रमाण ४५ ते ४७ टक्के होत असून कालव्याच्या मुखातून सद्य स्थितीत ५५० क्युसेकने पाणी सोडण्यात येत असून टेल भागात अंदाजे ७० ते ९० क्युसेकने (पावसाळ्या व्यतिरिक्त) पाणी मिळणे, यामुळे हेड व टेल या दोन्ही भागातील शेतकऱ्यांचे मोठया प्रमाणात नुकसान होणे, टेलच्या भागापर्यंत पूर्ण क्षमतेने पाणी पोहचण्यासाठी व कॅनोलची गळती रोखण्यासाठी तसेच चासकमान प्रकल्पाच्या अपूर्ण कामासाठी, जलसेतू अस्तरीकरणासाठी, चाऱ्यांची अपूर्ण कामे पूर्ण करण्यासाठी सुधारित प्रशासकीय मान्यता (सुप्रमा) मिळणेबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

अग्रिम प्रत

**(८) श्री. प्रमोद पाटील, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणात नागरिकरण होत असणे, महानगरपालिकेतील मुळ क्षेत्रासह २७ गावांमध्ये लोढा, रुणवाल, रिजन्सी, पॅराडाईज सारखे शेकडो एकरमध्ये सुरु असलेले मोठमोठे गृहप्रकल्प, म्हाडाच्या माध्यमातूनही अनेक बांधकामे सुरु असणे, या प्रकल्पाच्या माध्यमातून लाखो घरांची सुरु असलेली निर्मिती, डोंबिवली औद्योगिक क्षेत्र, मुळ महानगरपालिका क्षेत्रासह विस्तार झालेला असणे, निवासी विभाग औद्योगिक विभागासह मनपा क्षेत्रातील सर्व निवासी विभाग एम.आय.डी.सी. च्या बारवी डॅमवर अवलंबून असून पुरेसा पाणी कोटा व पुरवठा होत नसल्यामुळे सध्या २७ गावांसह संपूर्ण मनपा क्षेत्रात होत असलेली पाणी टंचाई, बारवी व्यतीरीक्त पाणी पुरवठ्यासाठी कोणताही इतर प्रकल्प सध्या सुरु नसल्याने भविष्यात पाण्याची परिस्थिती अधिकच बिकट होण्याची शक्यता, त्यामुळे कल्याण-डोंबिवली मनपा क्षेत्रातील वाढत्या लोकसंख्येचा विचार करून उल्हास नदीपात्रातून नवी मुंबई महानगरपालिकेस व्यपगत होणारा १४० दशलक्ष लीटर प्रतिदिन पाणी कोटा कल्याण-डोंबिवली मनपासाठी वर्ग करून उल्हास नदीच्या खोऱ्यामध्ये होणाऱ्या जलसाठ्यावर पाणी आरक्षण मिळावे व वाढीव कोटा मिळावा यासाठी सुरु असलेले प्रयत्न, याबबत वारंवार बैठका घेऊनही निर्णय घेतला जात नसणे, कडोंमपा मधील नागरीकांचे पाणी टंचाईमुळे होत असलेले हाल पाहता या प्रकरणी तातडीने लक्ष घालून कल्याण-डोंबिवली साठी आवश्यक असलेला पाणी कोटा वाढवून उल्हास नदीपात्रातून नवी मुंबई महानगरपालिकेस व्यपगत होणारा १४० दशलक्ष लीटर प्रतिदिन पाणी कोटा कल्याण-डोंबिवली मनपासाठी वर्ग करण्याबाबत तातडीने निर्णय होण्याची आवश्यकता व शासनाची प्रतिक्रिया."

**(९) ॲड. आशिष जयस्वाल, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"राज्याच्या अर्थसंकल्पात प्रत्येक वर्षी जिल्हा वार्षिक योजना व राज्य योजनेतून मोठा निधी पायाभूत सुविधेवर खर्च होणे, प्रत्येक वर्षी जिल्हा वार्षिक योजनेत वाढ होणे व त्यातुन सामुहिक विकासाची व कायमस्वरूपी मालमत्ता निर्माण करणाऱ्या योजना राबविण्यात येणे, परंतु उपरोक्त विकास कामे घेताना रोजगार निर्मितीकडे शासनाचे दुर्लक्ष होणे, एकूण विकास कामे करताना दरडोई उत्पन्न वाढविणाऱ्या योजना प्रभावीपणे अंमलात आणण्यात शासनाचे झालेले दुर्लक्ष, सामाजिक न्याय विभाग व आदिवासी विकास विभागाकडून ही मोठ्या योजना अंमलात आणताना साधारणत: १२.५० टक्के व ९.६ टक्के निधी खर्च होणे, परंतु त्यातूनही मोठा निधी फक्त पायाभूत सुविधेवरच खर्च

होणे, त्यामुळे आर्थिकदृष्टया दुर्बल व दारिद्रयात जीवन जगत असलेल्या कुटुंबियांच्या जीवनात उत्थान करण्याच्या शासनाच्या उद्देशाची पुर्तता होण्यास विलंब होणे, राज्यात राहणाऱ्या लोकांची रोजगार निर्मिती व उत्पन्नवाढ याकडे शासनाने प्राधान्य देण्याची गरज, मागील ७५ वर्षात राज्यात मोठी पायाभूत सुविधा निर्माण झाली असतानाही आता पुन्हा बहुतांश निधी हा नागरिकांच्या गरजेनुसार न होता शासनाच्या प्रचलित योजनेवरच खर्च होत असल्याने याबाबत पुनर्विचार करण्याची आवश्यकता, राज्याच्या मनुष्यबळाचा विचार करून त्या मनुष्यबळाचा वापर होण्याच्या दृष्टीने व राज्याची उत्पादकता वाढविण्याच्यादृष्टीने राज्यात लागणारे सर्व वस्तुंचे उत्पादन राज्यातच होण्याच्या दृष्टीने व राज्याला आत्मनिर्भर करण्याच्यादृष्टीने नियोजन करण्याची आवश्यकता, याकडे नियोजन विभागाचे झालेले दुर्लक्ष, शासनाने पायाभूत सुविधेसोबत रोजगार निर्माण करण्याच्या योजनेसाठीही ठराविक निधी खर्च करण्याची आवश्यकता, याकडे शासनाच्या दुर्लक्षामुळे मोठ्या प्रमाणात बेरोजगारांची संख्या वाढत असल्याने उद्‌भवणाऱ्या प्रश्नाकडे शासनाने गांभीर्याने विचार करून नियोजन करण्याची नितांत आवश्यकता, याकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष, शासनाने याबाबत तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.”

**(१०) प्रा. वर्षा गायकवाड, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

“मुंबईतील धारावी ही आशिया खंडातील सर्वात मोठी झोपडपट्टी असणे, विभिन्न जाती आणि धर्माचे गरीब व मध्यमवर्गीय परिवार धारावीत गेली कित्येक दशकं एकजुटीने राहत असणे, या ठिकाणी अनेक लघु व मध्यम उद्योगधंदे कार्यरत असणे, या सर्वांमुळे धारावीची एक वेगळी ओळख निर्माण होणे, धारावी पुनर्विकास प्रकल्प हे देशातीलच नव्हे तर जगातील सर्वात मोठा पुनर्वसन प्रकल्प असणे, ६०,००० पेक्षा अधिक परिवारांच्या उज्ज्वल भविष्याचे स्वप्न या प्रकल्पावर अवलंबून असणे, २०१८ मध्ये संपन्न झालेल्या निविदा प्रक्रियेला बाजूला सारून शासनाने नव्याने धारावी पुनर्विकास निविदा काढणे, नव्याने बोलावलेल्या प्रक्रियेत पात्रता निकष आणि कामाच्या अनुभवाच्या अटी व शर्थींमध्ये मोठे बदल होणे, त्याविरोधात मा.उच्च न्यायालयात मागील निविदा लागलेले लोग दाद मागणे, हिंडनबर्गच्या (**Hindenburg**) अहवालामुळे मोठ्या आर्थिक अडचणीत सापडलेल्या अदानी समूह नवीन निविदा प्रक्रिया जिंकणे, सद्यस्थितीत अदानी समूहाला बाजारातून पतपुरवठा उपलब्ध करणे कठीण असणे, या पार्श्वभूमीवर धारावी पुर्नवसन प्रकल्प रखडण्याची शक्यता निर्माण होणे, यामुळे स्थानिकांत प्रकल्पाविषयी चिंता, असंतोष आणि भीतीचे वातावरण निर्माण होणे, सद्यस्थितीत अदानी समूहावर होत असलेले आरोप आणि त्यांची अस्थिर आर्थिक परिस्थिती पाहता त्यांना कामाचे आदेश (**Work Order**) न देणे आणि निविदेचा पुर्नविलोकन करण्याची तातडीची गरज असणे, याबाबत माननीय मुख्यमंत्र्यांना निवेदन

दिलेले असणे, परंतु याकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, परिणामी येथील नागरिकांमध्ये कमालीचा असंतोष निर्माण होणे, याबाबत शासनाने लक्ष घालून पुनर्विकास निविदा रद्द करून नव्याने निविदा प्रक्रिया राबवण्यासंदर्भात तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.''

(११) **सर्वश्री. बाळासाहेब थोरात**, **अमीन पटेल**, **अस्लम शेख**, **विजय वडेट्टीवार**, **अशोकराव चव्हाण**, **ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे)**, **सर्वश्री. बळवंत वानखडे**, **नानाभाऊ पटोले**, **प्रा. वर्षा गायकवाड**, **श्री. सुरेश वरपुडकर**, **श्रीमती प्रतिभा धानोरकर**, **सर्वश्री. लहू कानडे**, **संजय जगताप**, **संग्राम थोपटे**, **शिरीष चौधरी**, **कुमारी प्रणिती सुशीलकुमार शिंदे**, **डॉ.विश्वजित कदम**, **श्री. विक्रमसिंह सावंत**, **वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

